# महाराष्ट्र राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (सेट)

**(विद्यापीठ अनुदान आयोग मान्यताप्राप्त व महाराष्ट्र व गोवा शासन प्राधीकृत)**

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

सेट भवन, गणेशखिंड पुणे,-४११००७.

| | | |
|---|---|---|
| दूरध्वनी क्र.: ०२० – २५६२२४४६<br>संकेतस्थळ :<br>https://setexam.unipune.ac.in | | फॅक्स क्र. : ०२० – २५६९९२५०<br>ई–मेल : set_coordinator@unipune.ac.in |

सहायक प्राध्यापक पदासाठी राज्यस्तरीय पात्रता परीक्षा


OW/2024/G/113 दिनांक : २६/०७/२०२४

## जाहीर प्रकटन

दि. ७ एप्रिल, २०२४ रोजी आयोजित करण्यात आलेल्या ३९ व्या सेट परीक्षेसाठी SEBC प्रवर्गासाठी आरक्षण लागू करावे किंवा कसे याबाबत मार्गदर्शनपर पत्रव्यवहार सेट परीक्षा विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्याकडून महाराष्ट्र शासनास करण्यात आला आहे. शासनाकडून मार्गदर्शन प्राप्त झाल्यानंतरच त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल. परंतू सेट परीक्षेचा निकाल लवकरात लवकर जाहीर करण्याच्या दृष्टीने सेट विभाग नव्याने एसईबीसी प्रवर्गात समाविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांकडून त्यांच्या प्रवर्गाची माहिती मागविण्यात येत आहे.

त्यानुसार विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गाकरीता आरक्षण अधिनियम, २०२४ अन्वये, जे विद्यार्थी एसईबीसी प्रवर्गात समाविष्ट झाले आहेत अशा विद्यार्थ्यांनी **https://setexam.unipune.ac.in** या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या Form for SEBC Candidates या शिर्षकांतर्गत उपलब्ध असलेला अर्ज भरण्यासाठी दि. १९/०७/२०२४ ते २५/०७/२०२४ पर्यंत मुदत देण्यात आली होती. परंतू महाराष्ट्रातील अनेक ठिकाणी होत असलेल्या अतिवृष्टीमुळे काही विद्यार्थ्यांना मुदतीत अर्ज भरणे शक्य झाले नसल्याने सदर अर्ज भरण्याची मुदत **दि. २७/०७/२०२४ ते २८/०७/२०२४ सायंकाळी ६.००** पर्यंत वाढविण्यात आली आहे.

एसईबीसी प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांच्या आरक्षणाबाबत महाराष्ट्र शासनाकडून मार्गदर्शन प्राप्त झाल्यानंतर सदर मार्गदर्शनाच्या अधीन राहून दि. ७ एप्रिल, २०२४ रोजी आयोजित करण्यात आलेल्या सेट परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात येईल, कृपया याची नोंद घ्यावी.